# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.03.2026** **वार- रविवार**

---

**उदयसामंत**

पुणे जिल्ह्यातील उद्योगांना अखंडित ऊर्जा पुरवठा मिळावा यासाठी सर्व उद्योगांना पाईपद्वारे नैसर्गिक गॅस म्हणजेच PNGची जोडणी दिली जाईल, त्यासाठी “मागेल त्या उद्योगाला जोडणी” या तत्त्वावर विशेष मोहीम राबवली जाईल अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उद्योग आढावा बैठकीत ते आज बोलत होते. विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार या बैठकीला दूरस्थ माध्यमातून उपस्थित होते. जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासकीय आणि पोलिस अधिकारी देखील या बैठकीला उपस्थित होते.

सध्या राज्यात घरगुती एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य दिलं जात असून, व्यावसायिक गॅसचा पुरवठा केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केला जात आहे. कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार करणाऱ्या एजन्सींवर कडक कारवाई करण्यात येईल. असे प्रकार आढळल्यास नागरिकांनी ११२ या टोल फ्री क्रमांकावर तात्काळ तक्रार नोंदवावी, असं आवाहन उदय सामंत यांनी केलं. युद्धजन्य परिस्थितीमुळे विशेषतः लघुउद्योगांवर आर्थिक ताण निर्माण झाल्याने वीज बिल भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी उद्योग संघटनांनी केली आहे; याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन सामंत यांनी दिलं.

**पुणे मेट्रो**

पुणे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याची म्हणजेच माण-हिंजवडी आयटी पार्क ते शिवाजीनगर या मार्गाची अंतिम चाचणी नुकतीच पूर्ण झाली आहे. येत्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत ही मेट्रो सुरू करण्याचं उद्दिष्ट आहे. पुणे मेट्रोच्या या तिसऱ्या टप्प्यामुळे हिंजवडीपासून पुण्याच्या मध्यवर्ती भागापर्यंतचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.

**सारद मजकूर**

माणसातल्या माणूसपणाला सलाम करण्यासाठी पुण्यातील ‘सारद मजकूर’ या संस्थेच्या वतीने दर महिन्याला ‘मुळातून माणूस पुरस्कार’ दिला जातो. यंदाचा हा पुरस्कार मोलमजुरीचं आणि स्वच्छतेचं काम करणारे, संतोष गांगरकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक अशोक पुराणिक यांच्या हस्ते गांगरकर यांना गौरवण्यात आलं. पुरस्कार वितरणानंतर अमृता देसर्डा यांनी त्यांच्याशी संवाद साधला. कष्ट करताना पैशांचा कधी विचार केला नाही, मात्र आपण करत असलेलं काम प्रामाणिकपणानं करतो आहोत का, याचा विचार मी नेहमी करतो, असं मत गांगरकर यांनी यावेळी व्यक्त केलं.

**पांम संडे**

पाम संडे आज पुण्यात सर्वत्र धार्मिक पद्धतीनं साजरा करण्यात आला. येशू ख्रिस्त यांच्या यरुशलममध्ये झालेल्या विजयी प्रवेशाची आठवण म्हणून हा दिवस पाळण्यात येतो.

**वाहतूक**

हिंजवडीमध्ये ग्रामदैवत म्हातोबा देवाची यात्रा येत्या 2 एप्रिलला भरणार आहे. या यात्रेसाठी जवळपास 50 हजार भाविक येतील असा अंदाज आहे. या काळात हिंजवडी वाकड परिसरामध्ये वाहतुकीची समस्या होऊ नये, यासाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असं आवाहन वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी केलं आहे. दरम्यान पाषाण–बाणेर लिंक रोड इथं सोमवारपासून पासपोर्ट सेवा केंद्र सुरू होत आहे, त्या पार्श्वभूमीवर या परिसरात वाढत्या गर्दीमुळे संभाव्य वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक सनी निम्हण यांनी केली आहे.

**अहिंसा पुरस्कार**

पिंपरी चिंचवड जैन महासंघाच्या वतीने वर्धमान महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त दरवर्षी दिले जाणारे अहिंसा पुरस्कार यंदाही दोन एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे. शाकाहार आणि अहिंसेच्या विचारांचा प्रसार करणारे ज्येष्ठ कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख, समाजसेवक एम ए हुसेन, शिक्षण क्षेत्रात कार्य करणारे डॉक्टर मनोज देवळेकर आणि वास्तुतज्ञ आनंद पिंपळकर यांना अहिंसा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महावीर जयंतीनिमत्त महासंघाच्या वतीने अहिंसा पदयात्रा, भक्ती संध्या यासह अनेक धार्मिक कार्यक्रमांचही आयोजन करण्यात आलं आहे.

**पीएमपी**

पीएमपीमध्ये महिला प्रवाशांना सुरक्षितता द्या, अशा मागणीचं निवेदन पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पीएमपी प्रशासनाला दिलं आहे. पीएमपी बस थांब्यांवर पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी, पीएमपी अधिकाऱ्यांनी बस थांब्यांवर आणि प्रवासा दरम्यानही अचानक भेटी द्याव्यात, बस थांब्यांवर आणि बसमध्ये आपत्कालीन मदत यंत्रणा असाव्यात, आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक घटल्यानं मटारच्या भावात वाढ झाली असून, अन्य फळभाज्यांचे आणि पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. उन्हाळी रसाळ फळांची मुबलक आवक असल्यानं सर्व फळांचे भाव स्थिर आहेत. फुल बाजारात मागणी अभावी सर्वच फुलांचे भाव खाली आले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 तर किमान तापमान 16 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या तापमानात आणखी थोडी वाढ होण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**